Annual Reports of the institution 2022-23

# शैक्षणिक वर्ष 2022 - 23 या वर्षाचा शैक्षणिक अहवाल

सह्याद्री परिसर शिक्षण प्रसारक मंडळ पाचल संचलित श्री मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय पाचल या महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न होत आहे. या पारितोषिक वितरण समारंभाचे अध्यक्ष माननीय मनोहरजी खापणे साहेब, प्रमुख पाहुणे हुस्नबानू खालीपे मॅडम, पोलीस निरीक्षक जनार्धन परबकर साहेब, पाचल, रायपाटण हरळ व परुळे गावचे सरपंच, संस्थेचे सर्व पदाधिकारी, व्यासपीठावर विराजमान असलेले सर्व मान्यवर, या कार्यक्रमासाठी उपस्थित सर्व पालक, विद्यार्थी व माझे सर्व सहकारी बंधू भगिनी मी आपणासमोर शैक्षणिक वर्ष 2022 - 23 या वर्षाचा शैक्षणिक अहवाल सादर करीत आहे.

## भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सव

या महोत्सवानिमित्त हर घर तिरंगा हा उपक्रम दिनांक 9 ऑगस्ट ते 17 ऑगस्ट या कालावधीत महाविद्यालयामार्फत साजरा करण्यात आला. या उपक्रमाची सुरुवात 9 ऑगस्ट रोजी सामुदायिक राष्ट्रगीत गायन कार्यक्रमाने झाली. 10 ऑगस्ट रोजी मराठी वाङ्मय मंडळामार्फत राजापूर तालुक्यातील स्वातंत्र्यसैनिक या विषयावर डॉ. विकास पाटील यांचे व्याख्यान झाले. ११ ऑगस्ट रोजी ग्रंथालय विभागामार्फत महात्मा गांधी हा चित्रपट दाखवण्यात आला. 12 ऑगस्ट रोजी एनएसएस व नेचर क्लब विभागामार्फत वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. 13 ऑगस्ट रोजी आजीवन अध्ययन विभागामार्फत उरी हा चित्रपट दाखवण्यात आला. 14 ऑगस्ट रोजी स्वच्छता उपक्रम एनएसएस विभागामार्फत राबवण्यात आला. 15 ऑगस्ट रोजी सांस्कृतिक विभागामार्फत देशभक्तीपर गीत गायन कार्यक्रम घेण्यात आला. 16 ऑगस्ट रोजी हिंदी अभ्यास मंडळामार्फत देशभक्तीपर पुस्तकांचे प्रदर्शन घेण्यात आले. आणि 17 ऑगस्ट रोजी देशभक्तीपर महिला चित्रपट महिला विकास कक्षामार्फत दाखवण्यात आला.

## राष्ट्रीय परिषदा व चर्चासत्रांचे आयोजन

महाविद्यालयामार्फत या शैक्षणिक वर्षामध्ये भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. आयसीएसएसआर मुंबई, आंबेडकराईट हिस्टरी असोसिएशन व महाविद्यालयाच्या वतीने 21 व्या शतकातील भारत या विषयावर राष्ट्रीय परिषद घेण्यात आली. या परिषदेला शिक्षण सहसंचालक डॉ. संजय जगताप आणि मुंबई विद्यापीठाचे इतिहास विभाग प्रमुख डॉ. संदेश वाघ हे प्रमुख मान्यवर उपस्थित होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष

MANOHAR HARI KHAPANE COLLEGE OF ARTS & COMM. PACHAL

मनोहरजी खापणे साहेब यांना आंबेडकराईट हिस्टरी असोसिएशनच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. महाविद्यालयाच्या वतीने दुसरी राष्ट्रीय परिषद भारतीय स्वातंत्र्याची 75 वर्षे या विषयावर घेण्यात आली. आयएसएसआर च्या सहकार्याने ऑनलाइन व ऑफलाइन अशा दोन्ही मोडमध्ये ही परिषद संपन्न झाली. देशभरातील अनेक प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी या दोन्ही परिषदांना उपस्थित होते . याशिवाय महाविद्यालयामार्फत फेब्रुवारी 2023 मध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठीची एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

आपल्या महाविद्यालयाच्या एनएसएस विभागाने मुंबई विद्यापीठाच्या विविध उपक्रमात सहभाग नोंदवून महाविद्यालयाचे नाव विद्यापीठांमध्ये चमकवले आहे. एन एस एस विभागाच्या शुभम रबसे या विद्यार्थ्यांची नॅशनल एडवेंचर कॅम्प साठी निवड झाली होती. त्याने मनाली येथे हा कॅम्प यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. दुसरा विद्यार्थी अभिषेक तावडे याची एस आर डी कॅम्प साठी निवड झाली असून त्याने 26 जानेवारी रोजी झालेल्या संचालनामध्ये सहभाग घेतला. राजापूर पोलीस स्टेशन मार्फत आयोजित केलेल्या रांगोळी स्पर्धेमध्ये योजना गुरव या विद्यार्थिनीने दुसरा क्रमांक मिळविला. शिवस्वराज्य दिनानिमित्त विभागामार्फत डॉ. विकास पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याशिवाय विभागामार्फत वृक्षारोपण, परिसर स्वच्छता, रस्ता दुरुस्ती, व प्रबोधन पर व्याख्याने यांचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर रायपाटण येथे 19 डिसेंबर ते 25 डिसेंबर 2022 या कालावधीत संपन्न झाले. त्यामध्ये श्रमदान, जलसंवर्धन, प्रबोधन पर व्याख्याने व सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादींचे आयोजन करण्यात आले होते.

**सांस्कृतिक विभाग**

सांस्कृतिक विभागामार्फत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती, महाविद्यालयाचा 28 वा वर्धापन दिन कार्यक्रम, नवोदित विद्यार्थ्यांच्या स्वागताचा स्वागत समारंभ, लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवामध्ये सांस्कृतिक विभागाने सहभाग नोंदवला. राजेंद्र माने इंजिनिअरिंग कॉलेज देवरुख येथे आयोजित केलेल्या युवा महोत्सवात वक्तृत्व, कथाकथन,

PACHAL

एकपात्री अभिनय, पोस्टर मेकिंग, मेहंदी रेखाटन व तालवाद्य या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. तालवाद्य या स्पर्धेमध्ये सुदर्श समीर घागरे या विद्यार्थ्याने तृतीय क्रमांक मिळवला. त्याचबरोबर मुंबई विद्यापीठ मुंबई येथे झालेल्या अंतिम फेरीमध्ये तालवाद्य या स्पर्धेमध्ये सुदर्श घागरे या विद्यार्थ्याने विद्यापीठ पातळीवर तृतीय क्रमांक मिळाविला. विभागामार्फत महात्मा गांधीजी यांच्या जयंतीनिमित्त महात्मा गांधी यांचे जीवन याविषयी चित्रपट व पोस्टर प्रदर्शन आयोजित करण्यात आले. नवरात्र उत्सवानिमित्त सरस्वती पूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विभागामार्फत संविधान दिन साजरा करण्यात आला. ए. डि. श्रॉफ मेमोरियल ट्रस्टच्या वतीने महाविद्यालयांमध्ये वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. लांजा महाविद्यालयांमध्ये झालेल्या वक्तृत्व स्पर्धेमध्ये कु. मेघा देवरुखकर ही विद्यार्थिनी सहभागी झाली. वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त दिनांक 16 जानेवारी ते 28 जानेवारी 2023 या कालावधीत सांस्कृतिक विभागामार्फत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. त्यामध्ये पारंपरिक वेशभूषा दिवस, ब्लॅक अँड व्हाईट डे, चॉकलेट डे, खानाखजाना, प्रश्नमंजुषा, टायडे, सारी डे, स्वयंअध्ययन दिवस, रोज डे व मिस मॅच डे या दिवसांचे व पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

**ग्रंथालय विभाग**

ग्रंथालय विभागामार्फत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची ओळख करून देण्यासाठी ओरिएंटेशन कोर्स आयोजित करण्यात आला. मुंबई विद्यापीठाच्या बी.सी बुक अंतर्गत ग्रंथालयाला 11760 रुपयांचे अनुदान प्राप्त झाले. याशिवाय संस्थेचे उपाध्यक्ष माननीय शंकरराव चव्हाण साहेब यांनी ग्रंथालयाला वर्ल्ड बुक इन सायक्लोपीडिया म्हणजेच विश्वकोशाचे एक ते 22 खंड देणगी म्हणून दिले. विभागामार्फत डॉ. एस आर रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त डॉ. ए डी पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त विभागामार्फत वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. विभागामार्फत बेस्ट रीडर कॉम्पिटिशन, गोल्ड कार्ड वाटप योजना, निबंध स्पर्धा व पुस्तक प्रदर्शन यांचे आयोजन करण्यात आले.

**क्रिडा विभाग** या विभागामार्फत महाविद्यालय पातळीवरील सांघिक व वैयक्तिक क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या सांघिक स्पर्धांमध्ये कबड्डी, खो-खो, क्रिकेट व रस्सीखेच या स्पर्धांचा समावेश होता तर वैयक्तिक स्पर्धांमध्ये गोळा फेक आणि थाळी फेक या स्पर्धा घेण्यात आल्या.

**महिला विकास कक्ष** या विभागामार्फत भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित क्रांतिकारी महिलांच्या जीवनावर आधारित माहितीपट दाखवण्यात आला. महिला तक्रार निवारण समितीमार्फत सायबर क्राईम या विषयावर पोलीस निरीक्षक शिल्पा वेंगुर्लेकर मॅडम यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या विभागामार्फत गरजू व गरीब मुलींसाठी मोफत पास सेवा देण्यात आली. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थीनींचे मनोगत आणि सावित्रीबाईंच्या जीवनावर माहितीपट दाखवण्यात आला. या विभागामार्फत विद्यार्थिनींसाठी रक्तगट व हिमोग्लोबिन तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले.

**मराठी वांग्मय मंडळ** या विभागामार्फत श्रावण धारा हा पावसावरील कवितांच्या काव्य वाचनाचा कार्यक्रम घेण्यात आला. तसेच शेकोटीच्या कविता हा काव्यवाचनाचा कार्यक्रम विभागामार्फत घेण्यात आला. या विभागामार्फत भितिपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले.

**अँटी रॅगिंग विभाग** या विभागामार्फत प्रा एस डी कांबळे यांचे रॅकिंग एक समस्या या विषयावर व्याख्यान घेण्यात आले.

**हिंदी अभ्यास मंडळ** हिंदी अभ्यास मंडळामार्फत हिंदी पखवाडा साजरा करण्यात आला. त्यानिमित्त पुस्तक प्रदर्शन, काव्य संमेलन व दर्पण या भितीपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले. विश्व हिंदी दिनानिमित्त हिंदी पुस्तक प्रदर्शन व कवी नागार्जुन यांच्या साहित्यावर दर्पण या भितीपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले.

**स्कॉलरशिप विभाग व मैत्री संघ** या विभागामार्फत विद्यार्थ्यांना शासनामार्फत व इतर स्वयंसेवी संस्थामार्फत मिळणाऱ्या स्कॉलरशिप ची माहिती वेळोवेळी बैठका घेऊन देण्यात आली. त्यामुळे महाराष्ट्र शासन व केंद्र सरकारची स्कॉलरशिप मिळण्यासाठी अनेक विद्यार्थी पात्र ठरले. याशिवाय सुभद्राबाई शिक्षण निधी यांची बारा मुलांना स्कॉलरशिप मंजूर करण्यात आली. त्याशिवाय हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनीच्या स्कॉलरशिप साठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व सल्ला देण्यात आला.

**नेचर क्लब** याच भागामार्फत तळवडे आंबेवाडी येथे नऊ जानेवारी 2023 रोजी मनोभजन आयोजित करण्यात आले.

**स्टाफ अकॅडमी** या विभागामार्फत डॉक्टर ए डी पाटील यांचे व्याख्यान आणि किल्ले पाहिलेला माणूस या चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले.

विभाग प्रमुख

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri





# ● विभाग अहवाल ●

## मराठी भाषा व वाङ्मय मंडळ

मराठी भाषा व वाङमय मंडळाचे उद्घाटन २१ जुलै २०२२ रोजी महाविद्यालयाच्या वर्धापन दिनी करण्यात आले. दिनांक १० ऑगस्ट २०२२ रोजी हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत' राजापूर तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिक ' या विषयावर प्रा. डॉ.व्ही.एस. पाटील यांचे व्याख्यान संपन्न झाले. दिनांक २५ ऑगस्ट २०२२ रोजी 'श्रावणधारा' हा पावसावरच्या कवितेचा कार्यक्रम संपन्न झाला. यामध्ये पंधरा विद्यार्थ्यांनी स्वरचित कविता सादर केल्या. दिनांक १ डिसेंबर २०२२ रोजी ज्येष्ठ साहित्यिक नागनाथ कोत्तापल्ले यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. मराठी भाषा पंधराव्याड्या निमित्त १८ जानेवारी २०२२ रोजी ग्रंथालयातील दुर्मिळ मराठी पुस्तकांचे प्रदर्शन लावण्यात आले. दिनांक १९ जानेवारी २०२३ रोजी शेकोटीवरच्या कवितांचे 'शेकोटी संमेलन' संपन्न झाले.यामध्ये १८ विद्यार्थ्यांनी स्वरचित कविता सादर केल्या. २८ जानेवारी २०२३ रोजी ' मायबोली ' या भिंती पत्रिकेचे संस्थेचे अध्यक्ष श्री. मनोहरजी खापणेसाहेब यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्यांच्या हस्ते 'संवाद' या बातमीपत्राचे प्रकाशन करण्यात आले.' वाचू लिहू मराठी' हा उपक्रम मराठी भाषा पंधरवड्या निमित्त घेण्यात आला. ११ फेब्रुवारी २०२३ रोजी राजापूर,लांजा तालुका नागरिक संघ आयोजित आठव्या ग्रामीण साहित्य संमेलनात विद्यार्थ्यांनी स्वरचित कविता सादर केल्या. दिनांक १२ फेब्रुवारी २०२३ रोजी 'काव्योदय' या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या कवितासंग्रहाचे प्रकाशन साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री.प्रकाश देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. दिनांक २७ फेब्रुवारी २०२३ रोजी मराठी राजभाषा दिन उत्साहात करण्यात आला. यावेळी मराठी गौरवपर गीत गायन, व्याख्यान असे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते.

**स. प्रा. डॉ. व्ही. एस. पाटील**
**विभाग प्रमुख**

## सांस्कृतिक विभाग

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी या वर्षात पुढील कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात आले.

१) दिनांक २६/०६/२०२२ रोजी मोठ्या उत्साहात राजर्षि छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

२) दिनांक २१/०७/२०२२ रोजी महाविद्यालयाचा २८ वा वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन



IQAC Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

करण्यात आले होते. या आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थेचे सरचिटणीस मा. श्री. चंद्रकांत लिंगायत साहेब यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

३) दिनांक ३०/०७/२०२२ रोजी महाविद्यालयामध्ये एफ.वाय.,बी.ए.,कॉम. या वर्गामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी स्वागत समारंभ कार्यक्रमाचे आयोजित केले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

४) दिनांक ०१/०८/२०२२ रोजी लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथीनिमित्त व लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे मार्गदर्शक प्रा.एस.एस.धोंगडे यांनी 'लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांचे जीवन व कार्य' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या उदंड प्रतिसाद व उत्साहात पार पडला.

५) दिनांक १५/०८/२०२२ भारतीय स्वातंत्र्याचा ७५व्या अमृत महोत्सवानिमित्त हर घर तिरंगा उपक्रमाअंतर्गत देशभक्तीपर गीतगायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सरचिटणीस मा. श्री. चंद्रकांत लिंगायतसाहेब उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

६) दिनांक २३/०८/२०२२ रोजी मुंबई विद्यापीठाअंतर्गत राजेंद्र माने इंजिनिअरिंग कॉलेज, देवरुख, आंबव येथे युवा महोत्सवानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी वक्तृत्व, कथाकथन, एकपात्रीकर अभिनय, पोस्टरमेकिंग, मेहंदी रेखाटन, व तालवाद्य या स्पर्धांमध्ये सहभागी झाले होते. यामध्ये 'तालवाद्य' या स्पर्धेत सुदर्श समीर घागरे ( एस.वाय.बी.कॉम.) या विद्यार्थ्याने तृतीय क्रमांक पटकावला, तसेच दिनांक १२/०९/२०२२ रोजी 'तालवाद्य' या स्पर्धेत मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे अंतिम फेरीमध्ये विद्यापीठ स्तरावर सुदर्श समीर घागरे (एस. वाय.बी.कॉम.) या विद्यार्थ्याने तृतीय क्रमांक पटकावला.

७) दिनांक ०२/११/२०२२ रोजी महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त महात्मा गांधी यांच्या जीवनचरित्रावर चित्रपट व पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा गांधी यांचे'जीवन व कार्य' या विषयावर प्रा. एस.डी. कांबळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्याचबरोबर 'गांधी' चित्रपट विद्यार्थ्यांना दाखवण्यात आला, त्याचबरोबर पोस्टर प्रदर्शनामध्येही विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेला होता, या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला.



IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

८) दिनांक०३/१०/२०२२रोजी महाविद्यालयामध्ये नवरात्र उत्सवानिमित्त सरस्वती पूजन या कार्यक्रमाचे आयोजन केले होते, या कार्यक्रमासाठी संस्थेचे सरचिटणीस मा. श्री. चंद्रकांत लिंगायत साहेब उपस्थित होते, या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

९) दिनांक २६/१२/२०२२ रोजी महाविद्यालयामध्ये संविधान दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी मार्गदर्शक म्हणून डॉ. व्ही. एस. पाटील यांनी 'बलशाही भारतीय संविधान' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

१०) दिनांक ०६/१२/२०२२ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्य' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

११) दिनांक ०९/१२/२०२२ रोजी ५६वी ए. डी. श्रॉफ मेमोरियल, मुंबई व श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल - रायपाटण यांच्या संयुक्त विद्यमाने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा १) महामारीच्या अर्थव्यवस्थेचे व्यवस्थापन २) २०२७ पर्यंत भारताला पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवणे (स्वातंत्र्याची ८९ वर्षे) ३) विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये आंतरराष्ट्रीय वित्तव्यवस्थेची बदलती भूमिका ४) 'वाढत्या सायबर गुन्ह्यांचा धोका आणि उपाय' या विषयांवर आयोजित केली होती. यामध्ये प्रथम क्रमांक कु. रेश्मा कस्तुरे (एस. वाय. बी. ए.), द्वितीय क्रमांक मतीन भेरी (टी. वाय. बी. कॉम.), तृतीय क्रमांक कु. सायराबानू काझी (एस. वाय. बी. कॉम.), चतुर्थ क्रमांक कु. पूजा मोहिते (एस. वाय. बी. कॉम.) तर पाचवा क्रमांक कु. अंकिता धुळप (टी.वाय.बी.ए.) या विद्यार्थ्यांनी पटकावला. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी बहुसंख्येने हजर होते.

१२) दिनांक १२/०१/२०२३ रोजी कला व वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, लांजा जि. रत्नागिरी यांच्या मार्फत आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धेमध्ये कु. मेघा देवरुखकर (टी. वाय. बी.कॉम.) या विद्यार्थिनीने सहभाग घेतला होता.

१३) दिनांक १६ जानेवारी २०२३ ते २८ जानेवारी २०२३ पर्यंत महाविद्यालयामध्ये पारंपरिक वेशभूषा दिवस, ब्लॅक अँड व्हाईट डे, चॉकलेट डे खाना-खजाना, प्रश्न मंजूषा, टाय डे, सारी डे, स्वयं अध्ययन दिवस, रोज डे, मिशमॅच डे या दिवसांचे आयोजन व पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते व रात्री ९:३० वाजता विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

१४) दिनांक १९/०२/२०२३ रोजी छत्रपती शिवाजी

IQAC - Coordinator
Shri M. H. Khapane College of Arts & Commerce, Pachal

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

महाराज यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

१५) दिनांक २८/०२/२०२३ रोजी हरी तुकाराम खापणे स्मृतिप्रीत्यर्थ 'सायबर गुन्ह्यांचा धोका व उपाय' या विषयावर राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अनेक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये प्रथम क्रमांक व्दितीय क्रमांक तृतीय क्रमांक या विद्यार्थ्यांने व विद्यार्थिनीने पटकावला.

**स. प्रा. डॉ. बी. टी. दाभाडे**
**स. प्रा. पी. पी. राठोड**
**विभाग प्रमुख**

# महिला विकास कक्ष

महिला विकास कक्षांतर्गत सन 2022 - 23 या शैक्षणिक वर्षांमध्ये विद्यार्थिनींच्या विकासासाठी अनेक उपक्रम घेण्यात आले.

1) महाविद्यालयाच्या महिला विकास कक्षाच्या वतीने सोमवार दिनांक 12 ऑगस्ट 2022 रोजी हिमोग्लोबिन व रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये सर्व मुलींचे ' रक्तगट व हिमोग्लोबिन' तपासणी करून त्यांना आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात आले.

2) तसेच महाविद्यालयातील गरीब व गरजू विद्यार्थिनींना मोफत एसटी पासची सवलत देण्यात आली.

3) महिला विकास कक्षा अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती आयोजित 24/08/2022 रोजी 'सायबर क्राईम' या विषयावर राजापूर पोलीस स्टेशनच्या पीएसआय शिल्पा वेंगुर्लेकर मॅडम यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

4) 'स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी' वर्ष हे सर्वत्र जल्लोषात साजरे करण्यात आले त्याच पार्श्वभूमीवर 17/08/2022 रोजी महिला विकास कक्षाअंतर्गत 'स्वातंत्र्य चळवळीमध्ये योगदान' देणाऱ्या क्रांतिकारी महिलांच्या जीवनावर आधारित माहितीपट विद्यार्थ्यांना दाखवण्यात आला.

5) महिला विकास कक्षाअंतर्गत 3 जानेवारी 2023 रोजी सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. विद्यार्थिनींनी 'स्त्रियांचे समाजातील स्थान' या विषयावर मनोगत व्यक्त केले तसेच सावित्रीबाईंच्या जीवनावर आधारित माहितीपट दाखवण्यात आला.

6) 27/01/2023 रोजी रायपाटण येथील बागवेवाडी येथे झालेल्या भव्य रेकॉर्ड डान्स स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील एफ. वाय. बी.कॉम ची विद्यार्थिनी रोशनी सरदेसाई हिला 'उत्तेजनार्थ' पारितोषिक प्राप्त झाले त्याबद्दल महिला विकास कक्षाच्यावतीने प्राचार्यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला.

**स. प्रा. श्रीम. एम. डी. देवरुखकर**
**विभाग प्रमुख**



IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

# राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रम अहवाल 2022- 23

राष्ट्रीय सेवा योजना विभागात सन 2022-23 या शैक्षणिक वर्षामध्ये दोनशे विद्यार्थी प्रवेशित झाले होते. या विभागामार्फत दिनांक 21 जून 2022 रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यामध्ये प्रा. एन. जी. देवन यांनी योग प्रात्यक्षिकासह 'मानवतेसाठी योग' या विषयावर मार्गदर्शन केले. 22 जून 2022 रोजी महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी 400 साग व ऑस्ट्रेलियन बाभूळ अशा जंगली वृक्षांची लागवड करण्यात आली. दि. 26 जुलै 2022 रोजी ' कारगिल विजय दिन' महाविद्यालयात साजरा करण्यात आला. दि.12 ऑगस्ट 2022 रोजी दत्तक गाव रायपाटण व महाविद्यालय परिसरात स्वच्छता करण्यात आली. दि.13 ऑगस्ट 2022 रोजी महाविद्यालय परिसरात 200 फुलझाडांची लागवड करण्यात आली. दिनांक 14 ऑगस्ट 2022 रोजी महाविद्यालय ते सह्याद्री दर्शन परिसरातील रस्त्यावर आलेली झाडी मारून 'रस्ता सुरक्षा अभियान' राबविण्यात आले. त्याचबरोबर याच दिवशी रायपाटण गावी स्वच्छता करण्यात आली. दिनांक 27 ऑगस्ट 2022 रोजी महाविद्यालय परिसरात स्वच्छता करण्यात आली. 20 सप्टेंबर 2022 22 रोजी रत्नागिरी येथे प्री.एस. आर.डी./एन.आर.डी. शिबिरासाठी तीन विद्यार्थी सहभागी झाले होते, त्यातून टी.वाय.बी. कॉम. चा विद्यार्थी अभिषेक तावडे यांची रत्नागिरी जिल्ह्यातून प्री.एस. आर. डी./ एन. आर. डी. साठी 24 सप्टेंबर 2022 रोजी विद्यापीठस्तरीय निवड चाचणीसाठी मुंबईसाठी निवड झाली. तेथून 28 सप्टेंबर 2022 रोजी प्री. एस. आर. डी. / एन.आर.डी. सिलेक्शन शिबिरासाठी कोल्हापुरीसाठी निवड झाली. तेथून त्याची एस.आर. डी. साठी दिनांक 17 जानेवारी ते 26 जानेवारी 2022साठी संचलन शिबिरात सहभागी होऊन त्याने 26 जानेवारीच्या संचालनात सहभाग नोंदवला. दिनांक 24 सप्टेंबर 2022 रोजी एनएसएस सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. या सप्ताहामध्ये निबंध स्पर्धा, परिसर स्वच्छता, घोषवाक्य स्पर्धा, 'एनएसएस मध्ये माझी जबाबदारी' या विषयावर विद्यार्थी मनोगत, 'स्वच्छता काळाची गरज' या विषयावर डॉ. व्ही. एस. पाटील यांचे व्याख्यान असे विविध उपक्रम घेत गांधी जयंतीने या सप्ताहाचा समारोप



IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

करण्यात आला. दि. 13 ऑक्टोबर 2022 रोजी महाविद्यालय परिसर स्वच्छता व रायपाटणगावी स्वच्छता करण्यात आली. दिनांक 14 ते 23 ऑक्टोबर 2022 या कालावधीत महाविद्यालयाचा टी.वाय.बी. कॉम.चा विद्यार्थी शुभम रबसेने कुलु मनाली येथे झालेल्या नॅशनल एडवेंचर कॅम्प मध्ये सहभाग घेतला व हा कॅम्प यशस्वीरित्या पूर्ण केला. दिनांक 11 नोव्हेंबर 2022 रोजी शुभम रबसे याचे एडवेंचर कॅम्पमधील अनुभव कथन संपन्न झाले. दिनांक 21 नोव्हेंबर 2022 रोजी लांजा महाविद्यालयाने आयोजित केलेल्या नियोजन शिबिरात डॉ. व्ही.एस. पाटील यांनी सहभाग नोंदवला.

दिनांक 1 डिसेंबर 2022 पासून एड्स सप्ताह सुरू झाला. त्यामध्ये डॉ. व्ही. एस. पाटील यांचे व्याख्यान, निबंध स्पर्धा, पत्रिका वाटप असे विविध उपक्रम देण्यात आले. दिनांक 6 डिसेंबर 2023 रोजी मतदार नोंदणी शिबिर कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये राजापूरच्या नायब तहसीलदार दिपाली पंडित यांनी मतदार नोंदणी संबंधी माहिती दिली. यावेळी 25 नव मतदारांचे अर्ज भरून घेण्यात आले. दिनांक 8 डिसेंबर 2023 रोजी वनव्यापासून बचाव व्हावा म्हणून महाविद्यालय परिसरातील नेटच्या केबल उचलून वरती बांधण्यात आल्या. दिनांक 23 जानेवारी 2023 रोजी 'राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियाना' अंतर्गत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय रत्नागिरीचे आरटीओ इन्स्पेक्टर यासीन मुल्ला व आरटीओ इन्स्पेक्टर सोहेल ओहळ यांचे मार्गदर्शन झाले. दिनांक 24 जानेवारी 2023 रोजी मतदार दिनानिमित्त रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. दिनांक 25 जानेवारी 2023 रोजी परिसरात स्वच्छता करण्यात आली. राष्ट्रीय मतदार दिवस कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी रायपाटण गावचे तलाठी प्रसन्न गुरव, परळी गावचे तलाठी सतीश शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मतदान शपथ ही घेण्यात आली. दिनांक २७ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२३ या कालावधीत लांजा महाविद्यालयाने आयोजित केलेल्या एलटीपी शिबिरात दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. दिनांक 10 फेब्रुवारी 2023 रोजी आठव्या ग्रामीण साहित्य संमेलनानिमित्त संमेलन परिसरात विद्यार्थ्यांनी स्वच्छता केली. दिनांक 12 व 13 फेब्रुवारी 2023 रोजी संमेलनात स्वयंसेवक म्हणून पूर्णवेळ काम केले. अशा प्रकारे राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत या शैक्षणिक वर्षात विविध उपक्रम घेण्यात आले.

**स. प्रा. डॉ. व्ही. एस. पाटील**
**विभाग प्रमुख**

**स. प्रा. श्रीम. एम. डी. देवरुखकर**
**विभाग प्रमुख**



IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri



श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल-रायपाटण

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिर

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिर रायपाटण मुक्कामी १९ डिसेंबर ते २५ डिसेंबर २०२२ या कालावधीत संपन्न झाले. दि १९ डिसेंबर २०२२ रोजी शिबिराचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एस मेश्राम यांच्या हस्ते , रायपाटण गावचे सरपंच श्री.महेंद्र गांगण यांच्या अध्यक्षतेखाली झाले. दुपारच्या सत्रात नियोजन बैठक संपन्न झाली. दि.२० डिसेंबर २०२२ रोजी ग्रामीण रुग्णालय रायपाटण येथे सकाळच्या सत्रात स्वच्छता करण्यात आली. दुपारच्या सत्रात हळदीकुंकू समारंभ संपन्न झाला. सायंकाळच्या सत्रात विनोद करंदीकरसर,प्रभाकर पळसुलेदेसाई यांचे शिबिरार्थींना मार्गदर्शन लाभले. तदनंतर राष्ट्रीय सेवा योजना विभाग रत्नागिरीचे जिल्हा समन्वयक डॉ. राहुल मराठे यांचे 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' या विषयावर व्याख्यान झाले. दि २१ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी अर्जुना नदीवर गांगणवाडी येथे वनराई बंधारा घालण्यात आला. दुपारच्या सत्रात प्रसन्न गुरव यांनी ' स्पर्धा परीक्षांना सामोरे जाताना ' या विषयावर व्याख्यान दिले.सायंकाळच्या सत्रात माजी मुख्याध्यापक विनोद करंदीकर सर यांनी ' रायपाटण परिसरातील दुर्लक्षित ऐतिहासिक स्थळे' या विषयावर मार्गदर्शन केले. दिनांक २२ डिसेंबर २०२२ रोजी सकाळच्या सत्रात रायपाटण - पाचल या रोडवरील झाडी मारून परिसर स्वच्छता करण्यात आली. दुपारच्या सत्रात मंडल कृषी अधिकारी श्री. एम. डी. कांबळे यांचे 'शासकीय फळबाग लागवड योजना ' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. दिनांक २३ डिसेंबर २०२२ रोजी सकाळच्या सत्रात पुरेवाडी येथे बारा शोषखड्डे मारण्यात आले. दुपारच्या सत्रात ' बदलती जीवनशैली व आजचा युवक ' या विषयावर ग्रामीण रुग्णालय रायपाटणचे वैद्यकीय अधिकारी डॉ सुरजकुमार पंदिरकर यांचे व्याख्यान संपन्न झाले. दिनांक २४ डिसेंबर २०२२ रोजी वडचाई मंदिर परिसरात आठ शोषखड्डे मारून संगनाथेश्वर मंदिर परिसर स्वच्छता करण्यात आली . दुपारच्या सत्रात 'स्पर्धा परीक्षेतील विविध संधी' या विषयावर प्रा.बी.एस. जांभेकर यांचे व्याख्यान संपन्न झाले. रात्री प्रबोधनपर विविध गुणदर्शनाचा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला आहे. दिनांक २५ डिसेंबर २०२२ रोजी सकाळच्या सत्रात होळीचा मांड परिसर स्वच्छता, ग्रामपंचायत परिसर स्वच्छता, हनुमान मंदिर परिसर स्वच्छता करण्यात आली. दुपारच्या समारोप सत्रात रुचिता पांचाळ व आकाश गोसावी यांना बेस्ट स्वयंसेविका व बेस्ट स्वयंसेवक या पुरस्काराने संस्थेचे सरचिटणीस श्री. चंद्रकांतजी लिंगायत यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास संस्थेचे सरचिटणीस, श्री. चंद्रकांतजी लिंगायत अध्यक्षस्थानी होते. असे हे सात दिवसाचे शिबिर यशस्वी झाले.

**स. प्रा. डॉ. व्ही. एस. पाटील**
विभाग प्रमुख
**स. प्रा. श्रीम. एम. डी. देवरुखकर**
विभाग प्रमुख



IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of Arts & Commerce, Pachal

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

# ग्रंथालय विभाग

आधुनिक समाजाला ज्ञानकेंद्रित समाज बनविण्याचे आणि देशाच्या प्रगतीसाठी सुसंस्कृत पिढी तयार करण्याचे काम ग्रंथालये करीत आहेत. आजच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात पुस्तकांव्यतिरिक्त इ-बुक, जर्नल, व इंटरनेटद्वारे माहिती मिळत असली तरी ग्रंथबद्ध ज्ञानसाहित्याला पर्याय नाही. ग्रथांमधून ग्रंथबद्ध झालेली माहिती निरंतर असते. अभ्यासकांना आपले ज्ञान वृद्धिंगत करताना त्याचा उपयोगतर होतोच आणि त्यातील वांड.मयातून व्यक्तीची करमणूक व ज्ञान-लालसा भागविण्याचे काम ग्रंथालये करतात. ग्रंथ हेच गुरु, मित्र व मार्गदर्शक असतात. सांस्कृतीक, ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमि जशी ग्रंथालयातून मिळते तसेच ग्रंथ हे भविष्याकडे जाणारे मार्गही दाखवितात.

महाविद्यालयातील ग्रंथालयात क्रमिक पुस्तकांशिवाय मोठ्या प्रमाणात संदर्भ ग्रंथ आहेत. त्यात विश्वकोश, ज्ञानकोश, शब्दकोश अशा अनेक दुर्मिळ संदर्भ ग्रंथ इत्यादींचा समावेश आहे. या वर्षी आपल्या ग्रंथालयाने ८६ पुस्तके खरेदी केली आहेत. तर बी.सी.बुक बँक स्कीम मधून ४६ पुस्तके खरेदी केली आहेत. तसेच श्री. शंकरराव चव्हाण यांनी ग्रंथालयास २६ खंडांचा वर्ल्ड बुकविश्वकोश देणगी स्वरुपात दिले. त्यामुळे आतापर्यंत ग्रंथालयात एकूणग्रंथसंख्या ८२५० इतकी झाली आहे.

पश्चिम विभागीय केंद्र व भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद मुंबई कडून पुस्तक पेढी योजनेंतर्गत खरेदी केलेली एकूण ग्रंथ संख्या८७१आहे.

ग्रंथ, ग्रंथपाल व वाचक ही ग्रंथालयाची त्रिसूत्री असल्याने विद्यार्थी हा घटक, यातूनत्यांच्या शैक्षणिक कार्यात व भावी जीवनात यशस्वी होण्यासाठी अभ्यासक्रमाशिवाय स्पर्धा परीक्षा, सामान्य बुद्धिमत्ता चाचणी, बँक, रेल्वे, पोलीस निरिक्षकांसाठी उपयोगी पडणारी पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध आहेत. या पुस्तकांचा उपयोग विद्यार्थी, माजी विद्यार्थी व संशोधक करीत आहेत. वर्तमान काळासाठी जगातील ज्ञान मिळावे यासाठी सहा मराठी व एक इंग्लिश भाषेतील वर्तमान पत्र व विविध विषयांची व स्पर्धा परीक्षेस लागणारे वीस जर्नल्स ग्रंथालयात उपलब्ध आहेत.

ग्रंथालयातील सुविधा:

**१. बी. सी. बुक बँक योजना:**

मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागामार्फत बी.सी. बुक बँक योजनेअंतर्गत मिळालेल्या अनुदानातून मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी पुस्तके खरेदी करण्यात आली आहेत. बी. सी. बुक बँक योजनेअंतर्गत एकूण ६८८ पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध आहे.



IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

२. वाचन कक्ष:

महाविद्यालयातील ग्रंथालयात विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी वाचन कक्षाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

३. ग्रंथप्रदर्शन:

दिनांक१५/१०/२०२२ रोजी डॉ. ए. पी.जे. अब्दुलकलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन म्हणून ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले, त्याचे उदघाटन डॉ. ए. डी. पाटील यांच्या हस्ते पर पडला. तसेच दिनांक १४/०८/२०२२ रोजी हर घर तिरंगा या उपक्रमांतर्गत ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन केले होते, तसेच दिनांक १८/०१/२०२३ रोजी मराठी भाषापंधरवडा निमित्त ग्रंथप्रदर्शन आयोजित करण्यात आले. या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन प्र.प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम यांच्या हस्ते सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले. आणि दिनांक१०/०१/२०२३ रोजी हिंदी वैश्विक दिनानिमित्त ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन केले होते, त्याचे उदघाटन प्रा. एस. व्ही. निंबाळकर यांच्या हस्ते पार पडला.

४. वाचक प्रेरणा दिन:

दिनांक १५/१०/२०२२ रोजी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती दिनी "वाचक प्रेरणा दिन" साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. तसेच एक तास वाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. तसेच दुर्मिड ग्रंथांचे प्रदर्शन सुद्धा आयोजित करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते. या दिवशी प्रमुख मार्गदर्शक म्हणून आमच्या महाविद्यालयाचे प्रा. ए. डी. पाटील उपस्थित होते. त्यांनी 'वाचन संस्कृतीचे महत्व' या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

५.निबंध स्पर्धा:

ग्रंथालय विभागामार्फत "वाचन संस्कृती वाढविणेकाळाची गरज" या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये महेश यशवंत खापणे (एफ. वाय. बी. ए.) प्रथम क्रमांक, यश महादेव नेवरेकर (एफ. वाय. बी. ए.) व्दितीय क्रमांक, कु. सायरा अस्लम काझी (एफ.वाय.बी.कॉम) हिने तृतीय क्रमांक तसेच कु. आरसिन अ. रहेमान गडकरी हिने उत्तेजनार्थ बक्षीस व प्रमाणपत्र प्राप्त केले आहे.

६.सर्वोत्कृष्ट वाचक पुरस्कार:

महाविद्यालयामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी या हेतूने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षासाठी ग्रंथालयातून जास्तीत जास्त ग्रंथांचे वाचन केलेल्या आणि ग्रंथालय वाचन कक्षेचा वापर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांमधून तीन विद्यार्थ्यांची निवड उत्कृष्ट वाचक म्हणून करण्यात आली. त्यामध्ये कु. रेश्मा राया कस्तुरे (एस.वाय.बी.ए.) प्रथम क्रमांक, कु. ज्योती गंगाराम कांबळे



IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

(एफ.वाय.बी.कॉम.) व्दितीय क्रमांक, कु.सायरा अस्लम काझी (एफ.वाय.बी.कॉम.) हिने तृतीय क्रमांक प्राप्त केले.

**७. दैनिक वर्तमानपत्रांची कात्रणे काढणे:**

विद्यार्थ्यांना दैनंदिन वर्तमान घडामोडींचे ज्ञान प्राप्त करून देण्यासाठी दररोजच्या वर्तमानपत्रांमधून वेगवेगळ्या विषयांवर प्रकाशित होणाऱ्या माहितीचे कात्रण काढून फलकावर लावले जाते व नंतर ते फाईलला ठेवली जातात.

**८. ग्रंथालय मार्गदर्शन:**

शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वर्गानुसार मार्गदर्शनाचे कार्यक्रम आयोजित केले जाते. त्यामध्ये ग्रंथालयाचे नियम, अटी व उपलब्ध साहित्याबाबत माहिती दिली जाते.

**सहकार्य :**

प्र.प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम, ग्रंथालय सल्लागार समितीचे प्रमुख डॉ. ए. डी. पाटील व सदस्य प्रा. डॉ. व्ही. एस. पाटील, प्रा. एन. जी. देवन, प्रा. स्नेहल चव्हाण आदींनी मार्गदर्शन केले. पुस्तकांचे दाते, ग्रंथालय परिचर सौ. स्नेहा कोलते, कार्यालय प्रमुख श्री. नरेश पाचलकर, कर्मचारी वृंद व विद्यार्थी इ. नी वर्षभर मोलाचे सहकार्य केले. या सर्वांचे आभार, धन्यवाद !

**स. प्रा. डॉ. ए. डी. पाटील**
**डॉ. एम. आर. कोंडागुर्ले**
**विभाग प्रमुख**

# बी.सी. स्कॉलरशिप विभाग / बी.सी .बुक. बँक. / बी. सी. अडवायझरी कमिटी / मैत्री संघ

महाविद्यालयाच्या बी.सी .स्कॉलरशिप/ बी.सी .बुक -बँक /बी.सी . ॲडव्हायझरी कमिटी ,व मैत्री संघ विभागाच्या वतीने विभागातील सर्व सदस्यांची शैक्षणिक वर्ष 2022 23 ची बैठक घेऊन त्यानुसार विभागाच्या सन 2022 23 चे वार्षिक नियोजन करण्यात आले त्यानुसार महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना भारत सरकारच्या व इतर सहकारी समाजसेवी कंपन्या व संस्था यांच्याकडून दिला जाणाऱ्या स्कॉलरशिप संबंधी माहिती मिळावी म्हणून वेळोवेळी सूचना काढण्याचे निश्चित करण्यात आले त्यानुसार दिनांक 28/6/2022 रोजी बार्टी



IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & CO...

पुणे पुरस्कृत व सेवा सामाजिक विकास संस्था रत्नागिरी द्वारा आयोजित विद्यार्थी विकास मोफत प्रशिक्षण व विद्या वेतन संबंधी माहिती नोटीस काढून विद्यार्थ्यांना कळविण्यात आली तसेच 29/6/2022 रोजी समाज कल्याण च्या वस्तीग्रह प्रवेशासंबंधी नोटीस काढून विद्यार्थ्यांना याची कल्पना दिली व दिनांक 26/8/2022 रोजी सर्व विद्यार्थी व शिक्षक यांची प्राचार्यांच्या समवेत बैठक घेऊन मुलांना उपलब्ध असणाऱ्या सर्व स्कॉलरशिप व त्यासाठी लागणारी कागदपत्रे व ती कागदपत्रे मिळवण्यासाठी मार्गदर्शन केले व असेही निश्चित केले की दाखलांच्यासाठी तालुका तहसीलदारांशी चर्चा करून आवश्यक असेल तर स्पेशल कॅम्पचे ही आयोजन करण्यात येईल यानंतर स्कॉलरशिप चा आढावा घेण्यासाठी दिनांक 16/11/2022 रोजी या विभागाची पुन्हा बैठक आयोजित करण्यात आली होती. तसेच शासनाकडून आलेल्या वेळोवेळीच्या सूचना लक्षात घेऊन दिनांक 22/8/2022 दिनांक 8/10/2022 दिनांक 11/11/2022 व दिनांक 14/11/2022 रोजी नोटीस काढून सूचना केल्या ,तसेच या शैक्षणिक वर्षात हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनी मुंबई .या संस्थेकडे 31 विद्यार्थ्यांनी एक लाख 77 हजार 500 रुपयाच्या स्कॉलरशिप साठी मागणी अर्ज केले आहेत. तसेच सुभद्राबाई शिक्षण निधी मुंबई या संस्थेकडे ही वीस विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज केले होते पैकी 12 विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले ,पैकी 11 विद्यार्थ्यांनी प्रत्येकी 5000/- याप्रमाणे 55 हजार रुपये च्या शिष्यवृत्ती चा लाभ घेतला .तसेच मुस्लिम चॅरिटेबल ट्रस्ट राजापूर व श्री तुकाराम पुंडलिक शेटे ट्रस्ट मुंबई साठी देखील दोन विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, भटक्या विमुक्त या प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी देखील भारत सरकार शिष्यवृत्तीसाठी अर्ज केले आहेत व अजूनही लिंक सुरू असल्यामुळे करत आहेत ओपन प्रवर्गातील मुलांनी राजर्षी छत्रपती शाहू शिष्यवृत्तीसाठी अर्ज केले आहेत व अजूनही ही प्रक्रिया सुरू आहे. बीसी बुक बँकेच्या वतीने विभागाकडे उपलब्ध असलेली 642 पुस्तके मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अधिक एक याप्रमाणे वितरित केली जात आहेत मागील वर्षाचा लेखा अहवाल विद्यापीठाकडे पाठवलेला आहे व चालू वर्षासाठी अनुदान मिळवण्यासाठी ऑनलाईन अर्जही केलेला आहे या सर्व कामासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी .एस .मेश्राम , प्रा. डॉ. दाभाडे, ग्रंथपाल डॉ.कोंडागर्ले वरिष्ठ लिपिक राजेश चव्हाण व सहाय्यक सौ कोलते यांचे सहकार्य लाभले.

**स. प्रा. एस. एस. धोंगडे**
**विभाग प्रमुख**

IQAC -.Coordinator
...H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

# हिंदी अभ्यास मंडल

हिंदी अभ्यास मंडल की ओर से सन 2022-23 मे अनेक कार्यक्रमों का आयोजन किया गया। दिनांक 14 अगस्त 2022 हर घर तिरंगा इस राष्ट्रीय उपक्रम के अंतर्गत आपणे महाविद्यालय के हिंदी अभ्यास मंडल की ओर से देश में स्थित विभिन्न राष्ट्रपुरुष के पुस्तको का प्रदर्शन आयोजित किया गया। इस प्रदर्शनी का उद्घाटन महाविद्यालय के प्र. प्राचार्य डॉ. मेश्राम जी ने किया। दिनांक -20/9/2022 हिंदी पखवाडे निमित्त कवी हरिवंश राय बच्चन जी के कविता पर आधारित दर्पण भीती पत्रिका का प्रकाशन डॉ. मेश्राम जी के हाथो किया।इसअवसर पर हिंदी नवोदित कवियों का काव्य संमेलन का भी आयोजित किया था। इसमे अनेक नवोदित कवियोंने सहभाग लिय दिनांक 10/01/2023 को विश्व हिंदी दिवस के अवसर पर कवी नागार्जुन जी की संकलित कविताओं का दर्पण भीतीपत्रिका के रूप में प्रकाशन किया गया इस पत्रिका का विमोचन डॉ. मेश्राम जी ने किया, तथा इसी अवसर पर आयोजित पुस्तक प्रदर्शनी का उद्घाटन हिंदी विभाग के अध्यक्ष प्रा. निंबाळकर जी के हातों किया। भितीपत्रक प्रकाशन कार्यक्रम का प्रास्ताविक कु. सायरा बानू काजी.एफ.वाय.बी. कॉम ने किया ।तथा पुस्तक प्रदर्शनी का प्रास्ताविक कु.गडकरी एफ. वाय .बी .कॉम. ने किया। सभी कार्यक्रम का आभार हिंदी अभ्यास मंडल के प्रमुख प्रा. एस एस धोंगडे जी ने किया। इस विभाग कि ओर से ऐसे अनेक कार्यक्रम का आयोजन किया गया।

**स. प्रा. एस. एस. धोंगडे**
**विभाग प्रमुख**

# स्टाफ अकॅडमी विभाग

महाविद्यालयाच्या स्टाफ अकॅडमी विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष 2022- 23 मध्ये विविध विषयावर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले, त्यामध्ये दिनांक 9/7/2022 रोजी महाविद्यालयातील प्रा.डॉ. अशोक डी .पाटील यांनी किल्ले पाहिलेला माणूस या विषयावर मराठीतील थोर लेखक श्री गो .णी .दांडेकर यांच्या किल्ले भ्रमंती व किल्ल्यांचा अभ्यास व त्याचा साहित्य लेखना मध्ये समावेश या विषयावर सखोल व्याख्यान दिले .व ज्या - ज्या ठिकाणी गो.नि.दांडेकर यांनी किल्ल्यांना भेटी दिल्या त्याच्या चित्रफित ही दाखवण्यात आली त्यानिमित्ताने महाराष्ट्रातील ऐतिहासिक वारसा संबंधी जाणीव झाली .तसेच दिनांक .1/08/2022 रोजी स्टाफ अकॅडमी विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे व्यक्तित्व व कार्य याविषयी प्रा.सुभाष धोंगडे यांनी व्याख्यान दिले व त्यांचा सखोल व्यक्तिपट उलघडण्याचा प्रयत्न केला अशा प्रकारे या शैक्षणिक वर्षात स्टाफ अकॅडमी विभागाच्या वतीने या कार्यक्रमाच्या आयोजन करण्यात आले

**स. प्रा. एस. एस. धोंगडे**
**विभाग प्रमुख**



IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of
Arts & Commerce, Pachal.

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE
COLLEGE OF ARTS & COM.PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri

# जिमखाना विभाग

जिमखाना विभागा अंतर्गत सन 2022-23 या शैक्षणिक वर्षातील क्रीडा स्पर्धांचे आयोजन बुधवार दिनांक 11/01/2023 ते गुरुवार दिनांक 12/01/2023 या दोन दिवशी करण्यात आले होते. या स्पर्धेअंतर्गत वैयक्तिक व सांघिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. खो-खो मुले/मुली, कबड्डी मुले/मुली, क्रिकेट मुले/मुली, गोळाफेक, थाळीफेक या क्रीडा प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी आपले नैपुण्य दाखविले.

**स. प्रा. एस. व्ही. निंबाळकर**
विभाग प्रमुख

# ● वैयक्तिक अहवाल ●

## सह. प्रा. डॉ. पी. एस. मेश्राम

1. दिनांक १३ जून २०२२ रोजी संस्थेचे अध्यक्ष मा. मनोहर खापणे व चिटणीस मा. चंद्रकांत लिंगायत यांचे हस्ते 'दक्षिण कोकणातील धम्मदीक्षित बौद्धांमधील परिवर्तन' या दुसऱ्या प्रतीचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

१. दिनांक २५ व २६ जून २०२२ रोजी आंबेडकराइटहिस्ट्री कॉंग्रेस च्या वतीने चंद्रपूर येथील आंतरराष्ट्रीय दोन दिवसीय परिषदेत गडचिरोली विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे व डॉ. संदेश वाघ सर व मान्यवरांच्या हस्ते 'महात्मा फुले इमिनंट नॅशनल' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

२. दिनांक २५ व २६ जून २०२२ रोजी आंबेडकराइटहिस्ट्री कॉंग्रेस च्या वतीने चंद्रपूर येथील आंतरराष्ट्रीय दोन दिवसीय परिषदेत 'भारतातील अस्पृश्यता व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य' या विषयावर संशोधन पेपरचे वाचन केले.

३. दिनांक २५ व २६ जून २०२२ रोजी आंबेडकराइटहिस्ट्री कॉंग्रेस च्या वतीने चंद्रपूर येथील आंतरराष्ट्रीय दोन दिवसीय परिषदेत 'भारतातील अस्पृश्यता व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य' हा संशोधन पेपर या यु. जी. केअर लिस्ट जर्नल मध्ये प्रकाशित झाला.

४. दिनांक १४ ऑक्टोबर २०२२ रोजी श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल व आंबेडकराइटहिस्ट्री कॉंग्रेस च्या वतीने पाचल येथील राष्ट्रीय परिषदेत '२१व्या शतकातील बौद्धांचे सांस्कृतिक परिवर्तन : विशेष संदर्भ दक्षिण कोकण' हा संशोधन पेपर 'संशोधक' या यु. जी. केअर लिस्ट जर्नल (२३९४-५९९०) मध्ये प्रकाशित झाला.

IQAC - Coordinator
Shri- M. H. Khapane College of Arts & Commerce, Pachal

PRINCIPAL
SHRI MANOHAR HARI KHAPANE COLLEGE OF ARTS & COM PACHAL
A/P Raypatan,Tal- Rajapur,Dist- Ratnagiri